# निशाण क. १४९ वरील आदेश

वादी याने सदरचा अर्ज दाव्यात दुरूस्ती करणेस परवानगी मिळणेकरिता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी क्र.८(१) ही मयत झाली आहे. या दाव्यातील प्रतिवादी क्र. ८(२) ते ८(४) हे तिचे वारस पूर्वीच दाखल आहेत. सबब, दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी क्र. ८(१) चे नावाला गोल करणेत येवून त्यापुढे प्रतिवादी क्र. ८(२) ते ८(४) हे प्रतिवादी क्र. ८(१) चे वारस आहेत अशी दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादींनी सदर अर्जास म्हणणे दाखल केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार प्रतिवादी मयत होवून बरेच महिने उलटले आहेत. त्यामुळे अर्ज मुदतीत नाही. सबब, अर्ज फेटाळणेत यावा, अशी प्रतिवादींनी विनंती केली.

३. वादी, प्रतिवादीं तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. प्रतिवादी क्र.८ (१) ही मयत झाली आहे व तिचे वारस प्रतिवादी क्र. ८ (२) ते ८ (४) हे आहेत व ते यापूर्वीच दाव्यामध्ये समाविष्ट आहेत याबाबत उभय पक्षकारांमध्ये वाद नाही. प्रस्तुतचा दावा हा वाटपाचा आहे. त्यामुळे वादीने मागणी केल्याप्रमाणे दुरूस्तीस परवानगी देण्यास कोणतीच अडचण वाटत नाही. याकामी समाविष्ट असलेल्या वारसांव्यतिरिक्त इतर वारस मयत प्रतिवादी यांना असतील तरच मुदतीची बाब विचारात घेता येईल. मात्र, या कामी यापूर्वीच मयत प्रतिवादी क्र.८(१) हिचे वारस समाविष्ट असल्यामुळे या अर्जाबाबत मुदतीचा प्रश्नच निर्माण होत नाही. प्रस्तुत दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप बदलणार नाही असे मला वाटते. या दुरूस्तीमुळे प्रतिवादी यांचे कसलेही नुकसान होईल असे मला वाटत नाही. या सर्व

कारणास्तव प्रस्तुतचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे :

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी याने आजच दाव्यामध्ये दुरूस्ती करून पुढील तारखेस दाव्याची दुरूस्त प्रत दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/—
( गि.सु.माने )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.

देवगड
दिनांक २८/०२/२०१८